# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

## मराठी विभाग – जागतिक मराठी भाषा गौरव दिन

लोकमत

# मराठी भाषेची उपयोजितता वाढविण्याची गरज

## डॉ. संजय घोडेकर : राजगुरु महाविद्यालयात जागतिक मराठी राजभाषा दिन साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : मराठी भाषेच्या उपयोजनेतून जास्तीत जास्त व्यावसायिक संधी उपलब्ध होण्यासाठी साहित्यव्यवहार आणि दैनंदिन व्यवहार यांची प्रयत्नपूर्वक सांगड घालण्याची गरज असून, मराठी भाषेची उपयोजितता वाढली तर तिचा अधिक वापर वाढू शकेल, असे प्रतिपादन पाबळच्या पद्ममणी जैन कला वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय घोडेकर यांनी केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित जागतिक मराठी राजभाषा दिनानिमित्ताच्या कार्यक्रमात 'मराठी भाषेतील व्यावसायिक संधी' या विषयावर बोलत होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. डी. एम. मारकड, प्रा. एम. एल. मुळूक, प्रा. एस. एस. आल्हाट व कला शाखेचे विद्यार्थी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याची मागणी करताना मराठी ज्ञानभाषा व उच्चशिक्षणाची भाषा असावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

मराठी विभागाच्या वतीने मराठीतील म्हणींच्या जतन व संवर्धनाचा विचार करुन 'चला मराठी म्हण जपू या' असा संकल्प करुन विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सुमारे एक हजारापेक्षा अधिक म्हणींचे संकलन करण्यात आले. कवी कुसुमाग्रज आणि साहित्यिक पु. ल. देशपांडे यांच्या साहित्याचे अभिवाचनही या प्रसंगी करण्यात आले. मराठी भाषेतून राबविलेल्या स्वाक्षरी मोहिमेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे, सूत्रसंचालन ह्रषीकेश गरुड यांनी केले. डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी आभार मानले.

- डॉ. संजय घोडेकर म्हणाले, जेवढ्या व्यावसायिक संधी इंग्रजीतून शक्य आहेत, तेवढ्याच संधी मराठीतूनही उपलब्ध होऊ शकतात. त्यासाठी मराठी ज्ञानभाषा होण्याची गरज आहे. जगातील अन्य भाषांमधील ज्ञानाचा खजिना मराठीत आणण्यासाठी विद्यार्थ्यांना भाषांतरकार म्हणून आधुनिक काळात मोठ्या प्रमाणात व्यावसायिक संधी उपलब्ध आहेत.
- बहुश्रुतता, श्रोत्यांना खिळवून ठेवण्याची क्षमता असेल तर रेडिओ जॉकी, सूत्रसंचालक आदी घटकांकडे व्यवसाय म्हणून पाहता येईल. तसेच लेखनविषयक नियमांची माहिती करुन घेतल्यास मुद्रितशोधनाचे नवे दालन व्यवसाय म्हणून खुले होऊ शकेल.
- या वेळी त्यांनी कवी कुसुमाग्रजांचे मराठी भाषेतील योगदान सांगून मराठीच्या उत्पत्तीपासूनचा आढावा सांगितला.

Hello Pune Gramin
Page No. 4 Feb 28, 2019
Powered by: erelego.com

# मराठी भाषेची उपयोजितता वाढावी : डॉ. घोडेकर

राजगुरुनगर, ता. २८ : "मराठी भाषेची उपयोजितता वाढली तर तिचा वापर वाढू शकेल," असे मत पाबळच्या पद्ममणि जैन कला वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय घोडेकर यांनी येथे व्यक्त केले.

ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, डॉ. संजय शिंदे, डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. डी. एम. मारकड, प्रा. एम. एल. मुळूक, प्रा. एस. एस. आल्हाट आदी उपस्थित होते. मराठी विभागाच्या वतीने मराठीतील म्हणींच्या जतन व संवर्धनाचा विचार करून 'चला मराठी म्हण जपू या' असा संकल्प करून विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सुमारे एक हजारांपेक्षा अधिक म्हणींचे संकलन करण्यात आले. कवी कुसुमाग्रज आणि साहित्यिक पु. ल. देशपांडे यांच्या साहित्याचे अभिवाचनही या प्रसंगी करण्यात आले. मराठी भाषेतून राबविलेल्या स्वाक्षरी मोहिमेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले.



राजगुरुनगर (ता. खेड) : मराठी राजभाषा दिनानिमित्त कार्यक्रमात बोलताना प्राचार्य डॉ. संजय घोडेकर.

# मराठीची उपयोजितता वाढविण्याची गरज

## डॉ. संजय घोडेकर यांचे मत

**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

मराठी भाषेच्या उपयोजनातून जास्तीत जास्त व्यावसायिक संधी उपलब्ध होण्यासाठी साहित्य व्यवहार आणि दैनंदिन व्यवहार यांची प्रयत्नपूर्वक सांगड घालण्याची गरज आहे, असे मत पाबळ येथील जैन कला-वाणिज्य महाविद्यालयाचे प्रांचार्य डॉ. संजय घोडेकर यांनी व्यक्त केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागातर्फे आयोजित जागतिक मराठी राजभाषा दिवसानिमित्त कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. डी. एम. मारकड, प्रा. एम. एल. मुळूक, प्रा. एस. एस. आल्हाट व कला शाखेचे विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. घोडेकर म्हणाले की, व्यावसायिक संधी जेवढ्या इंग्रजीतून शक्य आहेत, तेवठ्याच संधी मराठीतूनही उपलब्ध होऊ शकतात. त्यासाठी मराठी ज्ञानभाषा होण्याची गरज आहे. जगातील अन्य भाषांमधील ज्ञानाचा खजिना मराठीत आणण्यासाठी विद्यार्थ्यांना भाषांतरकार म्हणून मोठ्या प्रमाणात व्यवसायिक संधी उपलब्ध आहेत. तसेच रेडीओ जॉकी, सूत्रसंचालक आदी घटकांकडे व्यवसाय



**हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मार्गदर्शन करताना डॉ. संजय घोडेकर.**

म्हणून पाहता येईल. लेखनविषयक नियमांची माहिती करून घेतल्यास मुद्रितशोधनाचे नवे दालन व्यवसाय म्हणून खुले होऊ शकेल.

प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी मराठी ज्ञानभाषा व उच्चशिक्षणाची भाषा असावी अशी अपेक्षा व्यक्त केली. मराठी विभागाच्या वतीने 'चला मराठी म्हण जपू या'चा संकल्प करून विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सुमारे एक हजारांपेक्षा अधिक म्हणींचे संकलन करण्यात आले. कवी कुसुमाग्रज आणि साहित्यिक पु. ल. देशपांडे यांच्या साहित्याचे अभिवाचनही या प्रसंगी करण्यात आले. मराठी भाषेतून राबविलेल्या स्वाक्षरी मोहिमेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे आणि सूत्रसंचालन ऋषिकेश गरुड याने केले, तर डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी आभार मानले.

पुणे जिल्हा, शुक्रवार, १ मार्च २०१९ ५

# मराठी भाषेची उपयोजितता वाढावी : डॉ. घोडेकर

राजगुरुनगर, ता. २८ : "मराठी भाषेची उपयोजितता वाढली तर तिचा वापर वाढू शकेल," असे मत पाबळच्या पद्ममणि जैन कला वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय घोडेकर यांनी येथे व्यक्त केले.

ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, डॉ. संजय शिंदे, डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. डी. एम. मारकड, प्रा. एम. एल. मुळूक, प्रा. एस. एस. आल्हाट आदी उपस्थित होते. मराठी विभागाच्या वतीने मराठीतील म्हणींच्या जतन व संवर्धनाचा विचार करून 'चला मराठी म्हण जपू या' असा संकल्प करून विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सुमारे एक हजारांपेक्षा अधिक म्हणींचे संकलन करण्यात आले. कवी कुसुमाग्रज आणि साहित्यिक पु. ल. देशपांडे यांच्या साहित्याचे अभिवाचनही या प्रसंगी करण्यात आले. मराठी भाषेतून राबविलेल्या स्वाक्षरी मोहिमेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले.



राजगुरुनगर (ता. खेड) : मराठी राजभाषा दिनानिमित्त कार्यक्रमात बोलताना प्राचार्य डॉ. संजय घोडेकर.

लोकमत

पुणे, गुरुवार, दि. २८ फेब्रुवारी २०१९ ४

# मराठी भाषेची उपयोजितता वाढविण्याची गरज

## डॉ. संजय घोडेकर : राजगुरु महाविद्यालयात जागतिक मराठी राजभाषा दिन साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

[illegible]

[illegible] मागणी करताना मराठी ज्ञानभाषा व उच्चशिक्षणाची भाषा असावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

मराठी विभागाच्या वतीने मराठीतील म्हणींच्या जतन व संवर्धनाचा विचार करून 'चला मराठी म्हण जपू या' असा संकल्प करून विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सुमारे एक हजारापेक्षा अधिक म्हणींचे संकलन करण्यात आले. कवी कुसुमाग्रज आणि साहित्यिक पु. ल. देशपांडे यांच्या साहित्याचे अभिवाचनही या प्रसंगी करण्यात आले. मराठी भाषेतून राबविलेल्या स्वाक्षरी मोहिमेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे, सूत्रसंचालन हृषीकेश गरुड यांनी केले. डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी आभार मानले.

पुढारी
२८ फेब्रुवारी २०१९/६

# मराठीची उपयोजितता वाढविण्याची गरज

## डॉ. संजय घोडेकर यांचे मत



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मार्गदर्शन करताना डॉ. संजय घोडेकर.

**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

मराठी भाषेच्या उपयोजनातून जास्तीत जास्त व्यावसायिक संधी उपलब्ध होण्यासाठी साहित्य व्यवहार आणि दैनंदिन व्यवहार यांची प्रयत्नपूर्वक सांगड घालण्याची गरज आहे, असे मत पाबळ येथील जैन कला-वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय घोडेकर यांनी व्यक्त केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागातर्फे आयोजित जागतिक मराठी राजभाषा दिवसानिमित्त कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. डी. एम. मारकड, प्रा. एम. एल. मुळूक, प्रा. एस. एस. आल्हाट व कला शाखेचे विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. घोडेकर म्हणाले की, व्यावसायिक संधी जेवढ्या इंग्रजीतून शक्य आहेत, तेवढ्याच संधी मराठीतूनही उपलब्ध होऊ शकतात. त्यासाठी मराठी ज्ञानभाषा होण्याची गरज आहे. जगातील अन्य भाषांमधील ज्ञानाचा खजिना मराठीत आणण्यासाठी विद्यार्थ्यांना भाषांतरकार म्हणून मोठ्या प्रमाणात व्यवसायिक संधी उपलब्ध आहेत. तसेच रेडीओ जॉकी, सूत्रसंचालक आदी घटकांकडे व्यवसाय म्हणून पाहता येईल. लेखनविषयक नियमांची माहिती करून घेतल्यास मुद्रितशोधनाचे नवे दालन व्यवसाय म्हणून खुले होऊ शकेल.

प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी मराठी ज्ञानभाषा व उच्चशिक्षणाची भाषा असावी अशी अपेक्षा व्यक्त केली. मराठी विभागाच्या वतीने 'चला मराठी म्हण जपू या'चा संकल्प करून विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सुमारे एक हजारपेक्षा अधिक म्हणींचे संकलन करण्यात आले. कवी कुसुमाग्रज आणि साहित्यिक पु. ल. देशपांडे यांच्या साहित्याचे अभिवाचनही या प्रसंगी करण्यात आले. मराठी भाषिकांनी राबविलेल्या स्वाक्षरी मोहिमेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे आणि सूत्रसंचालन ऋषिकेश गरुड याने केले, तर डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी आभार मानले.

प्रभात पुणे, गुरुवार, दि. २८ फेब्रुवारी २०१९



राजगुरुनगर : मराठी भाषेतील व्यावसायिक संधी या विषयावर बोलताना प्राचार्य डॉ. संजय घोडेकर.

# मराठीची उपयोजिता वाढली पाहिजे - डॉ. घोडेकर

**राजगुरुनगर, दि. २७ (प्रतिनिधी) -** मराठी भाषेच्या उपयोजनातून जास्तीत जास्त व्यावसायिक संधी उपलब्ध होण्यासाठी साहित्यव्यवहार आणि दैनंदिन व्यवहार यांची प्रयत्नपूर्वक सांगड घालण्याची गरज असून मराठी भाषेची उपयोजितता वाढली तर तर तिचा अधिक वापर वाढू शकेल असे प्रतिपादन पाबळच्या पद्ममणि जैन कला वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय घोडेकर यांनी केले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित जागतिक मराठी राजभाषा दिनानिमित्ताच्या कार्यक्रमात मराठी भाषेतील व्यावसायिक संधी या विषयावर बोलत होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बी.डी.अनुसे, प्रा. डी. एम. मारकड, प्रा. एम. एल. मुळूक, प्रा. एस. एस. आल्हाट व कला शाखेचे विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एस.बी.पाटील यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याची मागणी करताना मराठी ज्ञानभाषा व उच्चशिक्षणाची भाषा असावी अशी अपेक्षा व्यक्त केली. मराठी विभागाच्या वतीने मराठीतील म्हणींच्या जतन व संवर्धनाचा विचार करून 'चला मराठी म्हण जपू या' असा संकल्प करून विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सुमारे एक हजारापेक्षा अधिक म्हणींचे संकलन करण्यात आले. कवी कुसुमाग्रज आणि साहित्यिक पु. ल. देशपांडे यांच्या साहित्याचे अभिवाचनही याप्रसंगी करण्यात आले.

पुण्य नगरी
शुक्रवार
१ मार्च २०१९
पुणे

# 'मराठी भाषेची उपयोगिता वाढविण्याची गरज'

। राजगुरुनगर : मराठी भाषेच्या वापरातून जास्तीत जास्त व्यावसायिक संधी उपलब्ध होण्यासाठी साहित्य व्यवहार आणि दैनंदिन व्यवहार यांची प्रयत्नपूर्वक सांगड घालण्याची गरज आहे. मराठी भाषेची उपयोगिता वाढली तर तर तिचा अधिक वापर वाढू शकेल, असे प्रतिपादन पाबळच्या पद्ममणि जैन कला वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय घोडेकर यांनी केले. हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित जागतिक मराठी राजभाषा दिनानिमित्ताच्या कार्यक्रमात 'मराठी भाषेतील व्यावसायिक संधी' या विषयावर ते बोलत होते. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, डॉ. संजय शिंदे, डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. डी. एम. मारकड, प्रा. एम. एल. मुळूक, प्रा. एस. एस. आल्हाट उपस्थित होते. या वेळी कवी कुसुमाग्रज आणि साहित्यिक पु. ल. देशपांडे यांच्या साहित्याचे अभिवाचनही करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख